महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,

## कॅम्प रोड, अमरावती— ४४४ ६०२

Ph.No. 0721-2662025 E-mail ID- naturalcalamity.amt@gmail.com

क्र.कक्ष-१४/ नियंत्रण कक्ष/जिआव्यप्रा/कावि- ३६५ /२०२०, दिनांक :- २८ /०५/२०२०

**आदेश**

**विषय :- कोरोना विषाणुचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना. इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बुलडाणा अंतर्गत अमरावती येथील आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयांच्या इमारती उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ:-** १) आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२) साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३) इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बुलढाणा यांचे पत्र क्र. ३१/२०२० दि. ३१.०३.२०२०

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशात तसेच राज्यामध्ये प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये अमरावती जिल्ह्याचे क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

ज्या अर्थी, राज्य शासनाने संदर्भाय ०१ अन्वये, कोरोना विषाणुचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक- १३ मार्च २०२० पासून लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बुलडाणा अंतर्गत अमरावती येथील संस्थेव्दारा संचालित ईंजिनिअरींग, फार्मसी, पॉलिटेक्नीक या महाविद्यालयांच्या इमारतीचे वर्ग खोली आयसोलेशन वार्ड व रुग्णसेवेकरीता शासनास वापरण्यासाठी उपलब्ध करुन देत असल्याचे नमूद केले आहे.

त्याअर्थी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात विविध उपायोजना करण्यात येत आहे. त्यामुळे इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बुलडाणा अंतर्गत अमरावती येथील संस्थेव्दारा संचालित महाविद्यालयांच्या इमारतींचे वर्ग खोली आवश्यक त्या सर्व साहित्यासह ताब्यात घेण्यात येत आहे.

त्याअर्थी इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बुलडाणा अंतर्गत अमरावती येथील संस्थेव्दारा संचालित ईंजिनिअरींग, फार्मसी, पॉलिटेक्नीक या महाविद्यालयांच्या इमारतीचे वर्ग खोली आयसोलेशन वार्ड व रुग्णसेवेकरीता ताब्यात घेण्यात आलेल्या संस्थेचा इमारती ह्या कोरोना विषाणुच्या प्रादुर्भाव रोखण्याकरीता करण्यात येणाऱ्या उपचाराकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे ताब्यात देण्यात येत आहे.

२८/५

( शैलेश नवाल )
जिल्हाधिकारी, अमरावती तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
अमरावती

प्रत :-
१. मा.विभागीय आयुक्त, अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीकरीता सादर.
२. पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
३. पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामिण यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता
५. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय,अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.
८. उपविभागीय अधिकारी अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
९. तहसिलदार अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१०. अध्यक्ष, इंदिरा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, बुलडाणा पत्ता- डॉ. गोंडे निवास, चिखली रोड बुलडाणा-
४४३००१ यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता

जिल्हाधिकारी अमरावती तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
अमरावती